महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

# महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना पी.एचडी करण्यासाठी अधिकतम ५ वर्षांसाठी अधिछात्रवृत्ती योजना

**योजनेचे नाव :** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) – वर्ष २०२२-२३

**पार्श्वभूमी :**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे उघडण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याची चळवळ उभी केली, त्यातून बहुजन समाजाला आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रगतीच्या वाटा सापडल्या व बहुजन समाज विकासाच्या मुख्य प्रवाहाचा भाग बनला. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचार व कार्याचा हा वारसा महाराष्ट्र शासनाद्वारे पुढे नेण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्रातील नॉन क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना पी.एचडी करण्यासाठी अधिकतम ५ वर्षांसाठी आर्थिक सहाय्य देण्यासाठी **महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF)** ही योजना सन २०२०-२१ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये योजनेअंतर्गत भारतातील UGC मान्यताप्राप्त विद्यापीठ/ महाविद्यालय /संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या पी.एचडी करणाऱ्या महाराष्ट्रातील नॉन-क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील अधिकतम २०० उमेदवारांना अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

**योजनेचा उद्देश :**

महाज्योती, नागपूर मार्फत महाराष्ट्रातील नॉन-क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना भारतातील UGC मान्यताप्राप्त विद्यापीठ/ महाविद्यालय / संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या पी.एचडी करण्यासाठी अधिकतम २०० उमेदवारांना अधिछात्रवृत्ती महाज्योतीच्या संचालक मंडळाने मान्यता दिल्याच्या दिनांकापासून अधिकतम ५ वर्षांसाठी अर्थसहाय्य करणे.

**लाभार्थी निकष** :

१. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
२. उमेदवार इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यापैकी नॉन-क्रिमिलेअर गटातील असावा.
३. उमेदवाराने पदव्युत्तर पदवी परीक्षा ही मान्यताप्राप्त विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्था मार्फत उत्तीर्ण केलेली असावी.
४. उमेदवार व्यक्तीने पी.एचडी धारण करण्याकरिता भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्था येथे नोंदणी (Confirmation) केलेली असावी. नोंदणी (Confirmation) नसलेली व्यक्ती योजनेच्या लाभाकरिता अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.
५. उमेदवार पी.एचडी धारण करण्याकरिता आधीच कोणतेही विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था / सारथी संस्था किंवा तत्सम इतर कोणतीही संस्था यांचेकडून अर्थसहाय्य अथवा अधिछात्रवृत्ती प्राप्त करत असल्यास असा उमेदवार योजनेच्या लाभाकरिता पात्र राहणार नाही.
६. उमेदवार व्यक्ती पी.एचडी करीत असलेल्या कालावधीत कोणत्याही स्वरूपाचा पूर्णवेळ अथवा अर्धवेळ रोजगार / स्वयंरोजगार करीत असल्यास किंवा कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य / मानधन / शिष्यवृत्ती घेत असल्यास योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.
७. दि.१ जानेवारी २०२१ ते अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत ज्या उमेदवाराने UGC मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्था / महाविद्यालयात पी.एचडी करीता नोंदणी करून Confirmation for PhD चे पत्र प्राप्त केलेले आहे, असे उमेदवार योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहे.
८. उमेदवाराकडे RRC/RAC कडून विषय मंजूर झाल्याचे पत्र प्राप्त झालेले असणे आवश्यक आहे.
९. ज्या उमेदवारांचे प्रवेश केवळ तात्पुरता (Provisional)आहे असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१. उमेदवाराचे आधार कार्ड
२. उमेदवाराचे PAN कार्ड
३. उमेदवाराचा रहिवासी दाखला
४. उमेदवाराचा जातीचा दाखला
५. उमेदवाराचे वैध नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र
६. उमेदवाराचे १० वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र
७. उमेदवाराचे १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र
८. उमेदवाराचे पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र
९. उमेदवाराचे पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र
१०. उमेदवाराचे NET/SET/PET/M.Phil परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र (ज्या आधारावर पीएचडी करिता प्रवेश मिळवला आहे त्या परीक्षेची माहिती देणे अनिवार्य आहे.)
११. उमेदवाराने पीएचडी करिता प्रवेश घेतल्याची पावती
१२. उमेदवारास विद्यापीठाने मार्गदर्शकाची नेमणूक केल्याबाबत पत्र (Guide Allotment Letter)
१३. मार्गदर्शकाने स्वीकृत केल्याबाबत पत्र (Guide Acceptance Letter)
१४.उमेदवारास RAC/RRC ने संशोधन प्रकल्पास दिलेल्या मान्यतेचे पत्र
१५.उमेदवाराचे पीएचडीकरिता नोंदणी पक्की झाल्याचे प्रमाणपत्र (Confirmation letter)

१६. RAC/RRC ने मान्यता दिलेला संशोधन सारांश – उमेदवार, मार्गदर्शक व RRC ने मंजूर केल्याच्या स्वाक्षरीसहित (Research Synopsis)
१७. संशोधन केंद्र प्राप्त झाल्याचे पत्र (Research Center Allotment letter)
१८. संशोधन केंद्रात संशोधनासाठी रुजू झाल्याचे पत्र (Research Center Joining Report)
१९. मार्गदर्शक व संशोधन केंद्र प्रमुख यांचे संयुक्त प्रमाणपत्र (विहित नमुन्यात)
२०. दिव्यांग प्रमाणपत्र (असल्यास)
२१. नावात बदल असल्यास त्याचा पुरावा (Change in Name - Gazzette) (असल्यास)
२२. रद्द करण्यात आलेला धनादेश (Cancelled Cheque)
२३. रोजगार किंवा स्वयंरोजगार करीत नसल्याबाबत व अधिछात्रवृत्ती मिळत नसल्याबाबत रु.५००/- च्या Stamp पेपरवर दंडाधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रतिज्ञापत्र.

(वरील कोणत्याही कागदपत्रांवरील दिनांकात खाडोखोड केल्यास असे प्रमाणपत्र /पुरावा अवैध ठरविण्यात येईल.)

**अर्ज कसा करावा :**

१. महाज्योतीच्या संकेतस्थळ www.mahajyoti.org.in वर ऑनलाईन स्वरूपात अर्ज मागविण्यात येत आहे.
२. संकेतस्थळावरील नोटीस बोर्ड मध्ये "महात्मा ज्योतिबा फुले संशोधन छात्रवृत्ती (MJPRF) – वर्ष २०२२-२३ करिता अर्ज" यावर क्लिक करून अर्ज करण्यात यावा.
३. ज्या उमेदवारांची या आधी महाज्योतीमार्फत निवड झालेली आहे अश्या उमेदवारांना अर्ज करता येणार नाही.
४. अर्ज करण्याची अंतिम दिनांक ३१ मे २०२२ आहे.
५. पोस्टाने पाठविलेले / मेल / प्रत्यक्ष सादर केलेला ऑफलाईन अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.
६. उमेदवाराने आपली सर्व माहिती काळजीपूर्वक, सत्य व अचूक भरावी, एकदा अर्ज सादर झाला तर त्यात कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.
७. अर्ज सादर करीत असताना रहिवासी दाखल्यानुसारच शहरी, ग्रामीण व आदिवासी क्षेत्र अचूक भरावे.

| अ क्र | वर्गवारी | क्षेत्र |
|---|---|---|
| १. | शहरी | महानगरपालिका, नगरपालिका अ गट व ब गट |
| २. | ग्रामीण | नगरपालिका क गट, नगरपंचायत, ग्रामपंचायत व ग्रुप ग्रामपंचायत |
| ३. | आदिवासी | महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/ का-५ दिनांक ९ मार्च १९९० च्या नुसार नमूद केलेले आदिवासी क्षेत्र (सोबत शासन निर्णय जोडला आहे.) |

८. ज्या उमेदवारांचे पदव्युत्तर पदवीचे ग्रेड किंवा CGPA असेल अश्या उमेदवारांनी त्याचे रुपांतर विद्यापीठाने निर्धारित केलेल्या पद्धतीत टक्केवारीत रुपांतरीत करून अचूक भरावे.
९. कोणत्याही कागदपत्रांवरील दिनांकात किंवा इतर तपशिलात खाडोखोड केल्यास असे प्रमाणपत्र /पुरावा अवैध ठरविण्यात येईल व अर्ज बाद ठरविण्यात येईल.
१०. कागदपत्रे सादर करताना त्यातील मजकूर स्पष्ट दिसेल असेच SCAN करून सादर करावे, अस्पष्ट/अवाचनीय कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत असे अर्ज बाद ठरविण्यात येतील.

११. रु.५००/- च्या STAMP वरील प्रतिज्ञापत्र दंडाधिकारी यांनी प्रमाणित केलेले नसेल तर ते स्वीकारण्यात येणार नाही.

१२. अचूक व अद्ययावत बँक तपशील देण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल, बँक तपशील हे केवळ उमेदवाराच्या नावाचेच असावे, इतर कोणत्याही व्यक्तीचे किंवा जोडखाते बँक तपशील स्वीकारण्यात येणार नाही.

१३. उमेदवाराने अर्ज सादर करताना खोटी किंवा अपूर्ण माहिती सादर करू नये, अशी माहिती सादर करून अधिछात्रवृत्ती मिळविल्यास व या कार्यालयाच्या निदर्शनास सदर बाब असल्यास त्याविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१४.अर्ज सादर करीत असताना वर नमूद सर्व कागदपत्रे व्यवस्थित SCAN करून नंतरच अर्ज करावा.

१५. अर्ज भरताना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या कॉल सेंटर वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :

८९५६७७५३७६, ८९५६७७५३७७, ८९५६७७५३७८, ८९५६७७५३७९, ८९५६७७५३८०

१६. योजनेसंदर्भात काही अडचणी असल्यास fellowshipmahajyoti@gmail.com या मेल आयडी वर संपर्क करावा.

**अर्थसहाय्याचा कालावधी :**

१. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन छात्रवृत्ती (MJPRF) चा कालावधी हा संचालक मंडळाने अंतिम निवड यादीस मान्यता दिल्याच्या दिनांकापासून ते संशोधन प्रकल्प विद्यापीठात सादर होण्याच्या तारखेपर्यंत असे ५ वर्षांसाठी किंवा जे आधी होईल तो कालावधी निश्चित करण्यात येत आहे.

२. उमेदवार व्यक्ती ५ वर्षांच्या कालावधीकरिता पी.एचडी धारण करण्यास असक्षम ठरल्यामुळे संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेने त्याकरिता मुदतवाढ दिल्यास, होणाऱ्या मुदतवाढीकरिता महाज्योतीमार्फत कोणत्याही परिस्थितीत अधिछात्रवृत्ती देण्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही. कोणत्याही परिस्थितीत ५ वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येणार नाही.

३. उमेदवार व्यक्तीने कोणत्याही कारणाने नोंदणी दिनांकापासून ते विद्यापीठात पी.एचडीकरिता रुजू दिनांकापर्यंत कालावधीत Gap घेतला तर उमेदवारास स्वयंस्पष्ट कारणासह संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेकडून गॅप प्रमाणपत्र महाज्योतीस सादर करणे बंधनकारक राहील. संबंधित कालावधीसाठी महाज्योतीमार्फत कोणत्याही परिस्थितीत अर्थसहाय्य दिले जाणार नाही.

**अर्थसहाय्य विवरण :**

| **अधिछात्रवृत्ती** | | |
|---|---|---|
| पी.एचडी करिता अधिछात्रवृत्ती | रु.३१,०००/- प्रति माह | महाज्योतीच्या संचालक मंडळाने मान्यता दिल्याच्या दिनांकापासून अधिकतम ५ वर्षांसाठी अर्थसहाय्य |

- उमेदवारास दर सहामाही संशोधन प्रगती अहवाल व मासिक हजेरी अहवाल सादर केल्यावर मंजूर दराने रक्कम बँक खात्यात जमा करण्यात येईल.
- वर नमूद अधिछात्रवृत्तीच्या रक्कमेशिवाय इतर कोणताही भत्ता किंवा अनुषंगिक खर्च महाज्योतीकडून देय राहणार नाही.

- शेवटच्या ६ महिन्यांचे शिष्यवृत्ती ही संशोधन प्रकल्प व तो विद्यापीठात सादर केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच देय असतील. लाभार्थ्यास पी.एचडी घोषित झाल्यावर संशोधन प्रकल्प व पी.एचडी घोषित झाल्याचे प्रमाणपत्र महाज्योतीस सादर करणे बंधनकारक राहील.
- एक सहामाही पूर्ण झाल्यावर पुढील लगतच्या सहामाही संपेपर्यंत पूर्ण झालेल्या लगतच्या सहामाहीचा प्रगती अहवाल सादर करणे बंधनकारक राहील, तसा अहवाल विहित कालावधीत व विहित नमुन्यात सादर न केल्यास सदर कालावधीची अधिछात्रवृत्तीची रक्कम व्यपगत होईल.

**स्थलांतर :**

संशोधन करण्याकरिता विद्यापीठ/ संस्था/ महाविद्यालय यात बदल केला असल्यास त्याबाबत महाज्योतीस उमेदवार व्यक्तीने माहिती देणे बंधनकारक आहे तसेच असा बदल महाज्योतीकडून केवळ एकदाच ग्राह्य धरण्यात येईल, त्यानंतर होणारा बदल मान्य केला जाणार नाही व त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार नाही.

**अर्थसहाय्यासाठी आवश्यक विवरणपत्रे / कागदपत्रे :**

१. रुजू प्रमाणपत्र : लाभार्थ्याने विद्यापीठ / संस्था / महाविद्यालयाचे रुजू प्रमाणपत्र (मार्गदर्शक व संशोधन केंद्र प्रमुख यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे) इतर सर्व आवश्यक कागदपत्रांसोबत महाज्योतीस सादर करावे, जे उमेदवार अंतिम निवड होण्याआधी रोजगार करीत असतील त्यांनी रोजगार करीत असलेल्या आस्थापनेने कार्यमुक्त केल्याचा अहवाल रुजू प्रमाणपत्र सोबत सादर करावा.
२. अर्धवार्षिक प्रगती अहवाल : लाभार्थ्याने संशोधनाचा प्रगती अहवाल नोंदणीच्या दिनांकापासून दर ६ महिन्यांनी सादर करणे आवश्यक आहे.
३. मासिक हजेरी प्रमाणपत्र : मार्गदर्शकाकडून हजेरी प्रमाणपत्र प्रमाणित करून देणे बंधनकारक आहे.
४. संशोधन अहवाल
५. संशोधन पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र / सुरु असल्याचे प्रमाणपत्र
६. पी.एचडी घोषित झाल्याचे प्रमाणपत्र

वरील सर्व कागदपत्रांचे नमुने उपलब्ध करून देण्यात येईल.

**आरक्षण :**

१. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील ३०% जागा महिलांसाठी आरक्षित आहे.
२. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील ५% जागा दिव्यांगाकरिता आरक्षित ( दिव्यांग प्रमाण – ४०% पेक्षा जास्त )
३. आरक्षणानुसार जागा वाटपाचे विवरण:

| अनु.क्र. | जागाचे वाटप | संख्या |
|---|---|---|
| १. | दिव्यांग – ५% | १० |
| २. | महिला – ३०% | ६० |
| ३. | सामान्य (महिला व पुरुष) – ६५% | १३० |
| | **एकूण** | २०० |

एकूण २०० उमेदवारांना पी.एचडी करिता अर्थसहाय्य देण्याबाबत आरक्षण पुढीलप्रमाणे :

**सामाजिक प्रवर्ग निहाय विभागणी :**

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग | आरक्षित टक्केवारी | आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १. | इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.) | ५९% | ११८ |
| २. | वि.जा.भ.ज. (व्ही.जे.एन.टी.) | ३५% | ७० |
| ३. | विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी.) | ६% | १२ |
| | **एकूण** | **१००%** | **२००** |

**ग्रामीण व शहरी विभागणी :**

१. उमेदवाराच्या रहिवासी दाखल्याच्या आधारावर सदर वर्गवारी करण्यात येईल.

२. महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का-५ दिनांक ९ मार्च १९९० च्या नुसार नमूद केलेले आदिवासी क्षेत्र राहतील.

| अ.क्र. | वर्गवारी | आरक्षित टक्केवारी | आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १. | **ग्रामीण** | ४०% | **८०** |
| २. | **शहरी** | ४०% | **८०** |
| ३. | **आदिवासी क्षेत्र** | २०% | **४०** |
| | **एकूण** | **१००%** | **२००** |

**महिला आरक्षण विभागणी :**

| | महिला | सर्वसाधारण | एकूण |
|---|---|---|---|
| **इतर मागास वर्ग** | ३५ | ८३ | **११८** |
| **वि.जा.भ.ज.** | २१ | ४९ | **७०** |
| **विशेष मागास प्रवर्ग** | ०४ | ०८ | **१२** |
| **एकूण** | **६०** | **१४०** | **२००** |

**विषय यादी व जागा विभागणी :**

१. **सामाजिक शास्त्रे :** (एकूण जागांच्या २५%) इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन, कायदेविषयक, मानसशास्त्र, तत्वज्ञान, गृहअर्थशास्त्र, अर्थशास्त्र, इत्यादी.
२. **विज्ञान :** (एकूण जागांच्या २५%) गणित, अंकशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगर्भशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणीय विज्ञान, संगणकशास्त्र इत्यादी
३. **तंत्रज्ञान :** (एकूण जागांच्या २५%) कृषी, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, अवकाश तंत्रज्ञान, आरोग्य, इत्यादी.
४. **वाणिज्य व व्यवस्थापन :** (एकूण जागांच्या १५%) वाणिज्य व व्यवस्थापन इत्यादी.
५. **भाषा :** (एकूण जागांच्या १०%) सर्व भारतीय भाषा व विदेशी भाषा.

**निवड प्रक्रिया :**

उमेदवारांची अंतिम निवड करण्यासाठी पुढील निकष लागू राहतील.

१. उमेदवारांची अंतिम निवड ही पदव्युत्तर पदवी परीक्षेत प्राप्त झालेल्या टक्केवारीच्या गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. ज्या उमेदवारास अधिक टक्केवारी असेल अश्या उमेदवारांना निवड प्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल.
२. निवड करीत असताना उपरोक्त निर्धारित जागांचे बंधन पाळण्यात येईल. ज्या जागांवर पात्र उमेदवार उपलब्ध होणार नाही त्या रिक्त ठेवण्यात येतील.
३. ज्या उमेदवारांचे पदव्युत्तर पदवी परीक्षेत प्राप्त झालेल्या टक्केवारी समान असेल अश्या स्थितीत त्यांच्या जन्मदिनांकाच्या जेष्ठतेनुसार प्राधान्य देण्यात येईल.

**निवड रद्द करणे :**

**पुढील बाबी आढळून आल्यास उमेदवाराची निवड रद्द ठरविण्यात येईल.**

१. चुकीची व असत्य कागदपत्रे सादर केल्यास.
२. उमेदवारास इतर संस्था/ विद्यापीठ / महाविद्यालय किंवा कुठूनही संशोधन भत्ता मिळत असल्यास.
३. उमेदवार योजनेचा लाभ घेताना रोजगार किंवा स्वयंरोजगार करीत असल्यास.
४. उमेदवाराने कोणत्याही कारणाने मध्येच पी.एचडी सोडल्यास.
५. उमेदवाराची प्रगती समाधानकारक न आढळून आल्यास.
६. इतर कागदपत्रे/ अहवालबाबत फसवणुकीचे वर्तन केल्यास.
७. उमेदवाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल झाल्यास.

योजनेच्या तपशिलात योग्य तो बदल करण्याचा अधिकार महाज्योतीच्या संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**व्यवस्थापकीय संचालक,**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर.**

**<u>परिशिष्ट अ</u>**

**-: प्रतिज्ञापत्राचा नमुना :-**

रु.५००/-च्या स्टँप पेपरवर

**प्रतिज्ञापत्र**

मा.कार्यकारी दंडाधिकारी यांच्या कोर्टात,

मी ........................................................................................ वय ................................ व्यवसाय ............................................................ पत्ता ............................................................. मोबाईल क्र.................................................. असे शपथ पूर्वक निवेदन करतो की,

१. मी ...........................................................या विषयात पीएच डी करण्याकरिता दि............................................................ रोजी नोंदणी केली असून माझे संशोधन केंद्र ............................................................................................ आहे. सदरच्या विषयासाठी ..................................................... हे माझे मार्गदर्शक आहेत.
२. या पीएच डी कालावधीत मला विद्यापीठ अनुदान आयोग/ इतर कोणतीही शासकीय संस्था / इतर अर्थ सहाय्य करणाऱ्या संस्था / महाविद्यालय / संस्था / शासन यांचेकडून अर्थसहाय्य किंवा अधिछात्रवृत्ती मिळत नाही.
३. या पीएच डी कालावधीत मला सारथी, पुणे किंवा तत्सम संस्थेकडून अर्थसहाय्य किंवा अधिछात्रवृत्ती मिळत नाही.
४. भविष्यात मला इतर कोणत्याही विद्यापीठ अनुदान आयोग/ इतर कोणतीही शासकीय संस्था / इतर अर्थ सहाय्य करणाऱ्या संस्था / महाविद्यालय / संस्था / शासन यांचेकडून अर्थसहाय्य किंवा अधिछात्रवृत्ती मंजूर झाल्यास मी ते महाज्योती, नागपूर यांना कळवून महाज्योती, नागपूर कडून प्राप्त झालेले अर्थसहाय्याची पूर्ण रक्कम परत करण्याची हमी देतो/ देते.
५. या पीएच डी कालावधीत मी कोणत्याही प्रकारचा पूर्णवेळ किंवा अर्धवेळ रोजगार/ नोकरी / व्यवसाय/ स्वयंरोजगार करीत नाही.
६. माझ्याविरोधात /माझ्यावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नाही, तसे आढळून आल्यास मी अधिछात्रवृत्ती मिळण्यास मी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

वरील सर्व मजकूर/ माहिती सत्य आहे. वरील माहिती असत्य आढळून आल्यास मी दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

शपथार्थीची सही :

शपथार्थीचे नाव :

सत्यापन

वरील सर्व मजकूर मी वाचला आहे व तो सत्य आहे तथापि मी आज दि.... / /२०२२ रोजी मुक्काम :........................ येथे प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करीत आहे.

आधार कार्ड क्र............................................

शपथार्थीची सही :

शपथार्थीचे नाव :

## <u>परिशिष्ट ब</u>

मार्गदर्शक व संशोधन केंद्र प्रमुख यांचे संयुक्त प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,
श्री./श्रीमती ____________________________________________ रा.______________________
जि.______________ हे ___________________ या विषयात _____________________ या विभागात
_______________________________________________________________________________

हे रिसर्च टायटल घेऊन संशोधन करीत आहे. त्यांची RRC/ORW/RAC ही दिनांक ____________ रोजी झालेली असून त्यांची पी.एच.डी. करण्यासाठी नोंदणी (Confirmation) झालेली असून त्यांचा नोंदणी क्रमांक (Confirmation) हा __________________ असून दिनांक ____________ ही त्यांची पी.एच.डी. नोंदणी दिनांक ठरविण्यात आलेली आहे. तसेच त्यांना दिनांक ______________ पर्यंत पी.एच.डी. चे संशोधन कार्य पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

वरील कालावधीत उपरोक्त नमूद संशोधकाला इतर कोणत्याही संस्थेकडून अधिछात्रवृत्ती प्राप्त नाही तसेच तो कोणताही रोजगार किंवा स्वयंरोजगार करीत नाही. संशोधक हा पूर्णवेळ विनाखंड संशोधन कार्य करीत आहे. संशोधक विद्यार्थ्यांचा प्रवेश हा निश्चित झालेला (Confirm) झालेला असून तो तात्पुरता (Provisional) नाही, याची खात्री करण्यात आलेली आहे. उपरोक्त भरलेल्या माहिती मध्ये कोठेच खाडाखोड करण्यात आलेली नाही.

तरी उपरोक्त नमूद संशोधकाची "महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) – वर्ष २०२२-२३" करिता अर्ज करण्यास आमची हरकत नाही.

संशोधन केंद्रप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का :

संशोधन केंद्र प्रमुखाचे नाव :
संशोधन केंद्र प्रमुखाचा मोबाईल क्रमांक :
संशोधन केंद्र प्रमुखाचा ई-मेल आय डी:

संशोधन केंद्राचे नाव :
संशोधन केंद्राचा पत्ता (पिनकोड सहित)
---------------------------------------------------------------------------------------------------------------
मार्गदर्शकाची स्वाक्षरी व शिक्का :

मार्गदर्शकाचे नाव :
मार्गदर्शकाचा मोबाईल क्रमांक :
मार्गदर्शकाचा ई-मेल आय डी:

# परिशिष्ट क

**पीएच.डी. जागा वाटप - २०० जागा**

**सामाजिक शास्त्र (५० जागा)**

| | इतर मागास वर्ग (५९%) - २९ जागा | | | विमुक्त जाती-भटक्या जमाती (३५%) - १८ जागा | | | विशेष मागास प्रवर्ग (६%) - ३ जागा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र |
| **सर्वसाधारण** | ८ | ८ | ३ | ५ | ५ | ३ | | | |
| **महिला** | ४ | ४ | २ | २ | २ | १ | | | |
| **एकूण** | **१२** | **१२** | **५** | **७** | **७** | **४** | **१** | **१** | **१** |

**विज्ञान (५० जागा)**

| | इतर मागास वर्ग (५९%) - २९ जागा | | | विमुक्त जाती-भटक्या जमाती (३५%) - १८ जागा | | | विशेष मागास प्रवर्ग (६%) - ३ जागा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र |
| **सर्वसाधारण** | ८ | ८ | ३ | ५ | ५ | ३ | | | |
| **महिला** | ४ | ४ | २ | २ | २ | १ | | | |
| **एकूण** | **१२** | **१२** | **५** | **७** | **७** | **४** | **१** | **१** | **१** |

**तंत्रज्ञान (५० जागा)**

| | इतर मागास वर्ग (५९%) - २९ जागा | | | विमुक्त जाती-भटक्या जमाती (३५%) - १८ जागा | | | विशेष मागास प्रवर्ग (६%) - ३ जागा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र |
| **सर्वसाधारण** | ८ | ८ | ३ | ५ | ५ | ३ | | | |
| **महिला** | ४ | ४ | २ | २ | २ | १ | | | |
| **एकूण** | **१२** | **१२** | **५** | **७** | **७** | **४** | **१** | **१** | **१** |

**वाणिज्य व व्यवस्थापन (३० जागा)**

| | इतर मागास वर्ग (५९%) - १८ जागा | | | विमुक्त जाती-भटक्या जमाती (३५%) - ११ जागा | | | विशेष मागास प्रवर्ग (६%) - २ जागा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र |
| **सर्वसाधारण** | ५ | ५ | ३ | ३ | ३ | २ | | | |
| **महिला** | २ | २ | १ | १ | १ | १ | | | |
| **एकूण** | **७** | **७** | **४** | **४** | **४** | **३** | **१** | **१** | |

**भाषा (२० जागा)**

| | इतर मागास वर्ग (५९%) - १२ जागा | | | विमुक्त जाती-भटक्या जमाती (३५%) - ७ जागा | | | विशेष मागास प्रवर्ग (६%) - १ जागा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र | शहरी क्षेत्र | ग्रामीण क्षेत्र | आदिवासी क्षेत्र |
| **सर्वसाधारण** | ३ | ३ | १ | २ | २ | | | | |
| **महिला** | २ | २ | १ | १ | १ | | | | |
| **एकूण** | **५** | **५** | **२** | **३** | **३** | **१** | | | **१** |

ज्या वर्गवारी मध्ये एकुण जागा केवळ १ आहेत तिथे ज्या क्षेत्रातील उमेदवारांना सर्वाधिक पदव्युत्तर पदवीची टक्केवारी असेल अश्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येइल, याची नोंद घ्यावी.